लोकमत

# विद्यार्थ्यांनी करिअरच्या कक्षा वाढवाव्यात

## अण्णासाहेब गुरव : आयटीआयमध्ये शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांनी ध्येयपूर्ती करून प्रगतीची उंची गाठण्यासाठी मुबलक वाचन करावे. मोबाइलसारख्या भौतिक साधनांचा योग्य वापर करून ज्ञानाच्या व करिअरच्या कक्षा रुंदवाव्यात, असे प्रतिपादन व्याख्याते डॉ. अण्णासाहेब गुरव यांनी केले.

औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय व जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मागदर्शन केंद्राच्या वतीने केशवराव भोसले नाट्यगृहात आयोजित राजर्षी छत्रपती शाहू महाराज युवा शक्ती करिअर शिबिरात ते बोलत होते. यावेळी प्राचार्य एम. एस. आवटे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी वाय. बी. पाटील, उप प्राचार्य व्ही. जे नार्वेकर उपस्थित होते.

या प्रशिक्षणास १ हजार विद्यार्थी व पालक उपस्थित होते. अजय मस्के यांनी व्यक्तिमत्व विकास विषयावर मार्गदर्शन केले. जॉर्ज क्रुझ यांनी १० वी व १२ वीनंतरचे रोजगार व करिअर संधी यावर मार्गदर्शन केले. बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापक गणेश गोडसे यांनी उच्च शिक्षण व उद्योगधंद्यासाठी उपलब्ध कर्ज योजनांची माहिती दिली.

22 MAY 2023 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ करणार भरड धान्यांचे मार्केटिंग!

## वनस्पतीशास्त्र विभागाचा नावीण्यपूर्ण उपक्रम; बचत गटांची घेणार मदत

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्षाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठ वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने नावीण्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार आहेत. महिला बचत गटांची प्रदर्शने भरवून त्या माध्यमातून भरड धान्यांचे पदार्थ बनवून नागरिकांना उपलब्ध करून दिले जाणार आहेत. भरड धान्यांचे गावोगावी बचत गटांमार्फत मार्केटिंग केले जाणार आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाने २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष म्हणून घोषित केले आहे. भरड धान्यांच्या निर्यातीस प्रोत्साहन देण्यासाठी व्यापार प्रदर्शने, शेतकरी आणि व्यापाऱ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून विविध उपक्रम राबविले जात आहेत. भरड धान्यास श्री अन्नदेखील म्हटले जाते. पूर्वीच्या काळी उंखळ व मुसळाचा वापर करून धान्यावरील साल, साळ किंवा कवच भरडून जात्यावर दळून पीठ केले जात असे. यामुळे या धान्याला भरड धान्य असे म्हटले जाते.



भरड धान्याचे विविध प्रकार असून सुमारे १६ प्रमुख प्रकारची भरड धान्ये भारतात पिकवली व निर्यात केली जातात. ज्वारी व बाजरी, कोडो बाजरी आकाराने मोठी धान्ये असून त्यांना 'ग्रेटर मिलेट' म्हणतात. आकाराने बारीक असलेली नाचणी, वरी, राळ, कोदो, बर्टी, प्रोसो व ब्राऊनटॉप ही सर्व 'मायनर मिलेट' समजली जातात. राजगिरा, बकव्हीट (कुट्टू) यांना 'स्यूडो मिलेटस्' म्हणतात. भरड धान्ये ही पौष्टिक तृणधान्य म्हणूनदेखील ओळखली जातात. ही पचायला हलकी असतात. भरड धान्य नियमित पेरल्यामुळे जमिनीतील नत्राचे प्रमाण वाढून मातीचा पोत सुधारतो. ही धान्ये पाळीव प्राणी व पशू-पक्ष्यांचे आवडते खाद्य आहे. यामुळे जैवविविधता वाढण्यास मदत होते.



ज्वारी



बाजरी



नाचणी



राळ



कोडो बाजरी



लहान बाजरी



वरी



बर्टी

> भरड धान्य वर्षाच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठाने विविध कार्यक्रम, उपक्रमांचे आयोजन केले आहे. भरड धान्य जनजागृतीसाठी महिला बचत गटांची मदत घेतली जाणार आहे. बचत गट प्रदर्शनाच्या माध्यमातून भरडधान्यांचे पदार्थ बनविणे, त्यांचे मार्केटिंगचे नियोजन केले जाणार आहे.
>
> **- डॉ. आर. व्ही. गुरव,**
> विभागप्रमुख, वनस्पतीशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ

भरड धान्य पौष्टिक, फायटोकेमिकल्स युक्त, ग्लुटेन मुक्त, आम्ल (ॲसिड) निर्माण न करणारी आणि ॲलर्जीविरहित असतात. भरड धान्याचे सेवन केल्यास रक्तातील शर्करा ट्रायग्लिसराइडस् व सी-रिॲक्टिव्ह प्रोटीनच्या प्रमाणात घट होते. ज्यामुळे हृदयविकार व रक्तवाहिन्यासंबंधी रोग टळू शकतात. ही धान्य तंतुमय (फायबर युक्त) असतात. यामुळे पचनाचा कालावधी वाढून आतड्याची दाहकता कमी होते. शरीरातील विषारी पदार्थ बाहेर फेकण्यास मदत होते. ही धान्ये पचनसंस्थेतील उपयुक्त जीवाणूंसाठी प्रोबायोटिक खाद्य म्हणून कार्य करतात. मधुमेही लोकांसाठी भरड धान्य खाणे आरोग्यास लाभदायक ठरते. ही धान्ये नियासीन कोलेस्ट्रॉल कमी करण्यासदेखील मदत करतात. याशिवाय त्यात भरपूर अँटिऑक्सिडंट, इतर क्षार व जीवनसत्त्वेसुद्धा मुबलक असतात म्हणून भरड धान्ये पचायला हलकी असतात, असे तज्ज्ञांचे मत आहे.

जनसंपर्क कक्ष
22 MAY 2023
पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समाजशास्त्र परिषदेचे आज 'शहाजी'मध्ये अधिवेशन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र परिषद व श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र परिषदेचे १४ वे अधिवेशन शहाजी महाविद्यालयात सोमवारी (दि. २२) होणार आहे. 'स्वातंत्र्याची ७५ वर्षे आणि स्त्रिया' या मुख्य विषयावर अधिवेशनात चर्चा होणार आहे.

शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्‌घाटन होणार आहे. यावेळी प्रा. प्रतिमा परदेशी मार्गदर्शन करणार आहेत. संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, मानद सचिव संगीता बोंद्रे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. परिषदेस उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. मच्छिंद्र सकटे यांनी केले आहे.

पुढारी

# विद्यापीठात उद्या 'पायवाट' शॉर्ट फिल्मचे स्क्रीनिंग

**मिथुनचंद्र चौधरी यांचे व्याख्यान; डॉ. ग. गो. जाधव अध्यासनाचा उपक्रम**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



शिवाजी विद्यापीठांच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने मंगळवार (दि.२३) रोजी सकाळी ११.३० वाजता विद्यापीठाच्या मानवव्यशास्त्र सभागृहामध्ये पुणे येथील सिम्बॉयसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीच्या ऑडिओ-व्हिज्युअल प्रोग्रॅम विभागाचे प्रमुख मिथुनचंद्र चौधरी यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. याप्रसंगी राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित चौधरी यांच्या 'पायवाट' शॉर्ट फिल्मचे स्क्रीनिंग होणार आहे.

डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे चालू शैक्षणिक वर्षापासून 'सर्टिफिकेट कोर्स इन डॉक्युमेंटरी फोटोग्राफी' व 'सर्टिफिकेट कोर्स इन शॉर्ट फिल्म मेकिंग' हे अभ्यासक्रम सुरू होत आहेत. अभ्यासक्रमाचा शुभारंभ चौधरी यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून, विद्यार्थी, चित्रपट क्षेत्राशी संबंधित संशोधक, अभ्यासकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.